वैद्यकीय व्यवसायाचे नाव : Pune Blood Bank

व्यवसायाचा पत्ता : Orient Villa, Serve No-266, Plot No. 6 Hadapsar P-28

डॉक्टरांचे/सुविधाधारकाचे नाव : Jayesh G. Gawde. 8237344447.

करारनामा लिहून घेणार 'मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था' ही सामाजिक उपक्रम राबविणारी संस्था नव्याने उदयास आलेली आहे. सदर संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट हे केवळ सामाजिक उपक्रम राबविणे आणि त्यातून सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक असलेल्या वैद्यकीय गरजांची सवलतीच्या दरात सर्वोतोपरी पूर्तता करणे हे आहे. त्याचबरोबर सदर संस्थेच्या माध्यमातून गरजू व गोरगरीब नागरिकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे, समाजाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या समाज उपयोगी गरजांची शक्य तितक्या चांगल्या पद्धतीने व दर्जात्मक स्वरुपात पुर्तता करण्याचे कार्य सदर संस्थेच्या माध्यमातून करणे हे संस्थेचे उद्दिष्ट आहे. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून संस्थेचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब धोंडिभाऊ पोखरकर यांनी सदर 'मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेची' सुरुवात केली आहे.

सदर सेवाभावी संस्था ही नोंदणी अधिनियम १८६० अन्वये मान्यताप्राप्त संस्था आहे. सदर संस्थेचा परवाना संस्थांचे सहाय्यक निबंधक यांचेमार्फत सदरचे सेवाभावी संस्थेस प्राप्त झाला आहे.

सदर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळ्या ठिकाणच्या दवाखाना/हॉस्पिटल यांना जोडण्याचा व यांचेमार्फत रुग्णांना सवलतीच्या दरात उपचारांची सुविधा देण्याचा विशेष प्रयत्न सदर संस्थेच्या माध्यमातून करण्याचा संस्थेचा मानस आहे. त्या दृष्टीने विशेषत: आंबेगाव, खेड आणि जुन्नर या तालुक्यांबरोबरच संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे मर्यादेपर्यंत सदर संस्थेचे कार्यक्षेत्र राहणार आहे.

सदर संस्थेच्या माध्यमातून समाजातील कुटुंबाना सभासद करण्यात येणार आहे. संस्थेच्या कार्यप्रणालीकरीता सभासदत्वाचे देयक/निधी हा कुटुंबातील व्यक्तिपरत्वे आकारण्यात येणार आहे. सदर निधीचा/देयकाचा लाभ हा सदर सभासदत्व मिळणाऱ्या कुटुंबातील वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असलेल्या सदस्यास मिळणार आहे.

संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीचे अनुशंघाने, दवाखाना/हॉस्पिटलचे व्यवस्थापन सदर संस्थेस जोडण्यात येणार आहे. प्रस्तुतची संस्था संस्थेचे सभासद कुटुंब व जोडण्यात आलेले सर्व दवाखाने/हॉस्पिटल यांची एकत्रित सांगड घालून सदर संस्थेचे कामकाज चालविण्याचा संस्थेचा सामाजिक हेतू आहे. संस्थेच्या माध्यमातून जोडण्यात येणाऱ्या दवाखाना/हॉस्पिटल प्रशासनाकडून संस्थेच्या कार्यासाठी कोणत्याही प्रकारचा निधी आकाराला जात नाही.

मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था अध्यक्ष बाळासाहेब पोखरकर यांनी वैद्यकीय क्षेत्रातील सर्व बाजूंचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे की, खालील वैद्यकीय क्षेत्रातील दिल्या जाणाऱ्या सुविधांवर नुकसान भरपाई दिनांक ०१ जानेवारी २०१९ पासून पुढील (.........) वर्षांसाठी करार करण्यास मी/आम्ही तयार आहे/आहोत.

**वैद्यकीय व्यवसायाचे नाव :** Pune Blood Bank, Hadapsar

**व्यवसायाचा पत्ता :** Getwell Blood storage, Manchar. Om Chaitanya Hospital Blood storage, Alephata.

**डॉक्टरांचे/सुविधाधारकाचे नाव :** Kurhade Akash Baburao

**पदवी :** Bsc DMLT **लॅन्डलाईन नं.** ............ **मोबाईल नं.** 9665104909, 9960006965

**OPD/प्रथम तपासणी फी :** ............ **फेरतपासणी फी :** ............

(वैद्यकीय क्षेत्रातील नुकसान भरपाई/आर्थिक देवाण-घेवाणीसाठी आपणाकडून बँकेची माहिती घेत आहोत.)

| | |
|---|---|
| **बँक खातेदाराचे नाव :** Getwell Blood Storage Centre. | |
| **बँकेचे नाव :** Central Bank of India | **शाखा :** Alephata. |
| **खाते (A/c) नंबर :** 3541759981 | **IFSC कोड :** CBIN0280669 |

- **नुकसान भरपाई खालील बाबींवर दिली जाईल:**

| अ. क्र. | संस्थेच्या नियमानुसार दिली जाणारी आरोग्य सवलत | वैद्यकीय क्षेत्रात दिली जाणारी रुग्णांच्या उपचारासाठी नुकसान भरपाई | सदर नुकसान भरपाई खालीलप्रमाणे आम्हाला मान्य राहील | नुकसान भरपाई मान्य असणाऱ्या अधिकृत वैद्यकीय सेवा देणाऱ्यांची सही |
|---|---|---|---|---|
| १. | **OPD तपासणी फी** ५०% माफ | ५०/७०/१०० रुपये/कुपन | | |
| २. | रक्त तपासणी फी – [ ]१० % किंवा [ ]२०% | ५ ते १०% पर्यंत | | |
| ३. | हॉस्पिटल अटॅच/वैयक्तिक मेडिकल सुविधा – [ ] १०% किंवा [ ] १५% | ५ ते १०% पर्यंत | | |
| ४. | हॉस्पिटल अटॅच सोनोग्राफी/एक्स-रे [ ] ५ किंवा [ ] १०% | ५ ते १०% पर्यंत | | |
| ५. | १० तासाच्या आतील ॲडमिट रुग्णांना उपचार [ ] १५ किंवा [ ] २०% | १०% पर्यंत | | |
| ६. | शस्त्रक्रिया बार्गेनिंग ५% पर्यंत (फायनल बील वेळी) | ५% पर्यंत | | |
| ७. | नॉरमल डिलिवरी ५०% कुटुंबाला वर्षातून एकदा (मुलीच्या जन्मासाठी) | ३० ते ५०% पर्यंत | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | सर्वसाधारण आजार/ॲडमिट बील १५% ते २०% | ०% पर्यंत | | |
| ९. | रेफर डॉक्टर ॲडमिट बील १५% (डॉ. रेफरन्स पुरावा) | ५% पर्यंत | | |
| १०. | रुग्णवाहिका सेवा ५०% | ३०% पर्यंत | | |
| ११. | रक्तपुरवठा लॅब ५०% | ३०% पर्यंत | 10% | [signature] |
| १२. | जनरिक मेडिकल ५०% | २०% पर्यंत | | |
| १३. | डायग्नोस्टीक सेंटर २०% | १०% पर्यंत | | |
| १४. | अंध-अपंग/मुकबधीर उपचाराच्या दरात ५०% (वर्षातून एकदा) | ३०% पर्यंत | | |
| १५. | घरपोच डॉक्टरसेवा ५०% (महिन्यातून एकदा) | ५०% पर्यंत | | |
| १६. | गरजू रुग्णांसाठी घरगुती ऑक्सिजन सेवा १००% | १००% पर्यंत | | |
| १७. | ॲडमिट रुग्णासाठी जेवणाचा डबा १००% (पहिल्या दिवशी) | १००% पर्यंत | | |
| १८. | हेल्थबॉडी चेकअप ५०% | ३० ते ५०% पर्यंत | | |
| १९. | शासकीय सरकारी योजना १००% | ०% पर्यंत | | |
| २०. | ५०% हॉस्पिटल उपचार | २५% ते ५०% पर्यंत | | |
| २१. | विमा संरक्षण अपघाती मृत्यु १००% नियम/अटी लागू | १००% पर्यंत | | |
| २२. | आरोग्य शिबिरे १००% | ०% पर्यंत | | |
| २३. | डोळ्यांचे उपचार व शस्त्रक्रिया | | | |
| २४. | इतर सुविधा | | | |
| २५. | | | | |
| २६. | | | | |

वरील मजकूर संस्थेच्या नियमावालीनुसार आम्हाला मान्य आहेत.

- वरील सुविधांचा लाभ घेणाऱ्या सभासदांसाठी वरील नुकसान भरपाई खालील नियमांनुसार बंधनकारक राहील :

१) वरील दिलेल्या सवलतीची नुकसान भरपाई मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेकडून दर २ ते ३ महिन्याच्या १ ते १० तारखेच्या दरम्यान आपल्या खात्यावर वर्ग करण्यात येईल किंवा चेकच्या स्वरुपात दिले जाईल व ते देण्यास संस्था जबाबदार राहील. असे न झाल्यास आपण संस्थेच्या अध्यक्षांसोबत चर्चा करून पुढील सेवा देण्याबाबत निर्णय घेता येईल. तसेच दिल्या गेलेल्या नुकसान भरपाईचे (कुपन व इतर सुविधा) प्रत्येक महिन्याचे नोंदणी रेकॉर्ड संस्थेस महिन्याच्या अखेरीस कळविण्यात येईल.

२) संस्थेच्या माध्यमातून येणाऱ्या रुग्णांना मी नमूद केलेल्या आरोग्य सुविधा/सेवा (सवलतीमध्ये) देण्यास बंधनकारक राहील. त्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार राहणार नाही.

३) OPD/इतर सुविधा कुपनवर मर्यादा राहणार नाही व कुपनवर वैयक्तिक नाव राहणार नाही. जेवढी कुपने जमा होतील तेवढे संस्थेने व वैद्यकीय सेवा देणाऱ्या सुविधा धारकाने ठरविलेल्या कुपनप्रमाणे पैसे हॉस्पिटलला दिले जातील. आरोग्य सुविधा घेण्यासाठी येणाऱ्या सभासदांजवळ संस्थेची फाईल व हेल्थ कार्ड पाहिल्यावर सभासदांची नावे व ऑनलाईन आय. डी. यांची चाचपणी केल्यावर व त्यावर नमूद असलेल्या नावांना (सभासदांना) ही सुविधा देण्यास आम्ही बंधनकारक राहू. परंतु संस्थेच्या सभासदाने शेवटी बिल देताना फाईल दाखविल्यास संस्थेच्या दिलेल्या नियमानुसार मी त्या सभासदास आमचे हॉस्पिटल व मी सवलत देण्यास बंधनकारक राहील. परंतु संस्थेने किंवा त्या रुग्णाने, नातेवाईकाने १२ तासाच्या आत हॉस्पिटलला कळविणे बंधनकारक राहील. त्यास संस्थेच्या नियमानुसार ज्या रुग्णाला सवलत देण्यास आम्ही जबाबदार राहू तसे न कळविल्यास त्या रुग्णाला सवलत मिळविण्यासाठी सर्वस्वी संस्थेची जबाबदारी राहील.

४) मैत्री हेल्थकेअर संस्थेच्या माध्यमातून येणाऱ्या रुग्णांकडून OPD कुपन/मेडिकल/लॅब व इतर सुविधा कुपन मी जमा करून त्यावरील आय.डी. नंबरची खात्री केल्यानंतर सवलतीच्या दरात संबंधित सेवा दिल्याचे रेकार्ड मी माझ्या हॉस्पीटलला तसेच संबंधित विभागामध्ये नोंद/जतन करून ठेवील. त्यासाठी मी स्वत: म्हणजेच डॉक्टर व मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्याशी झालेल्या वैयक्तिक चर्चा, पूर्वकल्पना, नियम व अटी या आमच्या वैयक्तिक पातळीवर राहतील. मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून रुग्णांना डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, गरजेनुसार व हॉस्पिटलच्या उपलब्ध अतिदक्षता विभाग, जनरल वार्ड, स्पेशल रूम, डिलक्स रूम व इतर सुविधा देण्यासाठी सहकार्य करणे गरजेचे आहे. त्यातून संस्थेचा हेतू साध्य होण्यास मदत होणार आहे.

५) मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून आलेला रुग्ण किंवा सभासद आपल्या हॉस्पिटलला व इतर सुविधा घेत असताना संस्थेच्या नुकसान भरपाई प्रमाणपत्रानुसार त्यास सवलत दिली जाईल व त्याची भरपाई संस्थेकडून घेतली जाईल. परंतु त्या रुग्णाने किंवा सभासदाने वैयक्तिक टक्केवारी वाढवून हॉस्पिटलला व इतर ठिकाणी त्रास केल्यास त्या सभासदास आम्हाला दिलेल्या नियमानुसार व फाईलमध्ये दिलेल्या टक्केवारीनुसार आम्ही सुविधा व सवलत देऊ शकतो, असे समजून सांगणे. त्याने न ऐकल्यास त्यास सभासदास संस्थेसोबत चर्चा करून निर्णय घ्यावा असे सांगणे राहील.

६) मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून येणाऱ्या सभासदांनी (रुग्णांनी) आपले हॉस्पिटल अथवा इतर सुविधांकरिता चौकशी केल्यास त्यांना आपण व आपले कर्मचारी यांनी आपले हॉस्पिटल अथवा इतर सुविधाधारक हे मैत्री हेल्थकेअर संस्थेच्या सभासदांना सेवा देण्यास जोडलेले आहे, अशी योग्य ती माहिती पुरवतील.

७) मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या नवीन येणाऱ्या आरोग्य विषयक संकल्पना, आरोग्य सुविधा हॉस्पिटलला पूर्व सूचना देऊन कळविण्यात येतील आणि त्यावर विचारविनिमय करून संबंधित संकल्पना तसेच सुविधा मान्य अगर अमान्य करण्यात येतील. त्यासाठी वैद्यकीय सेवेतून जनसेवा हीच ईश्वर सेवा मानून आपण सर्वांनी चांगले, उत्कृष्ट व दर्जात्मक कार्य करण्यास, गरजूंना आवश्यक असलेली सुविधा पुरविणे आणि तद्रुषांघिक इतर मदत करण्यास सदैव तत्पर असणे आवश्यक आहे. त्यास आम्ही पात्र राहू.

८) मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून सभासदांना (रुग्णांना) आरोग्य सेवा-सुविधा देत असताना आपल्या **OPD** फी मध्ये वाढ झाल्यास अथवा इतर कोणत्याही सुविधांचे चार्जेस/आकार वाढल्यास किंवा वाढवणार असल्यास एक महिना अगोदर त्याची पूर्वसूचना संस्थेला (अध्यक्ष) कळविणे बंधनकारक राहील. मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था व वैद्यकीय हॉस्पिटल/डॉक्टर यांनी एकमेकांशी एका विचाराने राहणे बंधनकारक राहील. एकमेकांची चुकीची माहिती संस्था व डॉक्टर/हॉस्पिटल यांनी दिल्यास संस्था किंवा डॉक्टर जबाबदार राहतील. इतर कोणीही चुकीची माहिती अथवा कोणत्याही माध्यमातून पसरविल्यास त्यावर संस्थेने व डॉक्टरांनी विश्वास ठेवू नये. त्याकरिता संस्था व डॉक्टर यांनी एकमेकांशी एकनिष्ठ राहणे दोघांचेही हितावह आहे.

९) मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून जर आपल्याला आपले हॉस्पिटल, मेडिकल, लॅब तसेच इतर सुविधा संस्थेच्या या करारामधून वगळायचे असल्यास अगर बंद करावयाचे असल्यास त्याची पूर्वसूचना सहा महिनेअगोदर संस्थेला (अध्यक्ष) कळविणे बंधनकारक राहील. परंतु संस्थेशी जोडलेल्या पूर्वीच्या सभासदांना आरोग्य सुविधा देण्यास मी बंधनकारक राहील.

१०) मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रामध्ये लाभ घेणारा सभासद/रुग्ण व त्यांचे उपचार याबाबत चाचपणी/चौकशी करण्यासाठी संस्थेचे अधिकृत अध्यक्ष, संचालक किंवा पदाधिकारी आपल्या हॉस्पिटलमध्ये अगर

सुविधाधारकांकडे आल्यास आपणाकडून संस्थेच्या संबंधित व्यक्तींना सहकार्य करण्यात येईल.

वर करारनाम्यामध्ये नमूद केलेला संपूर्ण मजकूर आम्ही लिहून देणार आणि लिहून घेणार यांनी वाचून, समजून, उमजून त्यावर राजीखुशीने स्वाक्षरी केली आहे. वरील माहिती चुकीची असल्याचे आढळून आल्यास मी भारतीय दंड संहिता कलम १९३, १९९/२ व २०० अन्वये कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

लिहून घेणार

.................................................

अध्यक्ष : मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था

लिहून देणार

नाव : Kurhade Akash Baburao

(Jayesh G-Gawde)